अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक १०/१०/२०२५

-: प्रेसनोट :-

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | ३२/२०२५ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| अटक आरोपी लोकसेवक | श्री. रणजीत बाळासाहेब चव्हाण, पद- स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कार्यकारी अभियंता वांद्रे विभाग, म्हाडा, मुंबई |
| लाचेची मागणी | प्रथमता रूपये ४,००,०००/- व तडजोडीअंती रूपये २,००,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रुपये ४०,०००/- |
| हस्तगत लाचेची रक्कम | रुपये ४०,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी यांचे पत्नीचे नावे असलेल्या रो हाऊसवर अनधिकृत पत्रे चढवून सदर रो हाऊस वापर पेईंग गेस्टचा व्यवसाय करण्याकरीता करीत असल्याचा रिपोर्ट म्हाडा कार्यालयातर्फे फिर्यादी यांना पाठवून सदर रो हाऊसवर कारवाई करण्यात येईल असे कळविले होते. सदर रो हाऊसवर कारवाई न करण्यासाठी लोकसेवक श्री रणजीत बाळासाहेब चव्हाण, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कार्यकारी अभियंता, म्हाडा, वांद्रे विभाग, मुंबई यांनी फिर्यादी यांचेकडे प्रथमता रू. ४,००,०००/- लाचेची मागणी केली. फिर्यादी यांनी सदर लाचेची रक्कम देण्यास असमर्थता दर्शविल्याने लोकसेवक यांनी तडजोडीअंती रू. २,००,०००/- लाचेची रक्कम टप्याटप्याने स्विकारण्याचे मान्य केले. परंतु फिर्यादी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि कार्यालयात दिनांक ०९/१०/२०२५ रोजी तक्रार अर्ज केला.<br><br>फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ०९/१०/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, यातील लोकसेवक श्री रणजीत बाळासाहेब चव्हाण यांनी फिर्यादी यांच्याकडुन तडजोडीअंती ठरलेल्या रू.२,००,०००/- लाचेच्या रक्कमेपैकी रू. ४०,०००/- लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने तात्काळ केलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री रणजीत बाळासाहेब चव्हाण यांना फिर्यादी यांचेकडून लाचेची रक्कम रू. ४०,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्री. मानसिंग पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. गणपत परचाके, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शक अधिकारी- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(मनिषा झेंडे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in, ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in, फेसबुक www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप www.acbmaharashtra.net